आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र.७१

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ९ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – घनशाम किसन औटी ,

वय – २८ वर्षे, व्यवसाय –शेती,

राहणार–तराळवाडी, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए. पटेकर यांचेमार्फत</u>**–

दि.१८/११/२०२२ रोजी आम्हाला वाघ साहेबांनी वडझिरे येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया येथे पंचनाम्यासाठी यायला सांगितले. त्यावेळी माझ्या सोबत माझा मित्र अजित सुरेश कावरे होता. आम्ही बँकेत दुपारी १२.०० वाजण्याच्या दरम्यान गेलो होतो व तिथे १.३० वाजेपर्यंत होतो. पंचनामा बँकेच्या फसवणूकी संदर्भात होता त्यासाठी आम्हाला बोलावले होते. त्यावेळी तेथे बँकेचे मॅनेजर श्री. रंगारी सर, वाघसाहेब, मी व अजित होतो. त्या दिवशी एकाच वेळी दोन पंचनामे केले. त्यावेळी गुलाबी रंगाच्या तीन पावत्या व एक विथड्रॉवलची पावती रंगारी साहेबाने वाघ साहेबांना दिल्या. पहिली पावती तिकोणे म्हणून व्यक्तीच्या नावे होती व तिचा क्र.११२२२० असा होता. ती पावती रक्कम रुपये तीन लाख पन्नास हजार रुपयांची होती. ती मुदत ठेव पावती होती.

दुसरी पावती मुदत ठेव पावती असून ती मोरे म्हणून महिला यांच्या नावे होती व तिचा क्र.११२२७६ असा होता. ती पावती रक्कम रुपये तीन लाख पन्नास हजार रुपयांची होती. त्या दोन पावत्या माझ्या समोर वाघ साहेबांनी सिल करून पॅकेटमध्ये पॅक केल्या. त्यानंतर आमच्यासमक्ष पंचनामा लिहून त्यातील मजकूर आम्हाला वाचून दाखवून त्यावर आम्ही सही केल्या. आता मला नि.४३ व ४७ वरील त्या दोन पावत्या दाखवण्यात आल्या. त्या पावत्या त्याच असून ते वाघ साहेबांनी आमच्या समक्ष सिल केल्या होत्या. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र. १ वर माझी सही असून त्यातील मजकूर मी वाचला होता त्यास **नि.७२** देण्यात येते.

तिसरी पावती सुखदेव पवार यांच्या नावे होती व तिचा क्र.११२२१२ असा होता व ती पावती रक्कम रुपय नऊ लाख बावीस हजारांची होती. ती गुलाबी व पिवळ्या रंगाची होती.

चौथी पावती विथड्रॉवल स्लीप असून ती गुलाबी रंगाची होती. ती पावती सुखदेव पवार यांच्या नावे होती व ती पावती रक्कम रुपय नऊ लाख बावीस हजारांची होती. दोन्ही पावत्या आमच्या समख सिलपॅक करून जप्त केल्या व पंचनामा तयार करून त्यावर आमच्या सह्या घेतल्या. आता मला त्या दोन्ही पावत्यांबद्दलचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.१ वर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.७३** देण्यात येते. आता मला नि.५२ वरील पावती दाखवण्यात आली. ती पावती तीच असून ती माझ्या समक्ष जप्त केली होती. ती पावती रंगारी साहेबांनी काढून वाघ साहेबांना दिली होती. आता मला नि.५१ वरील गुलाबी रंगाची विथड्रॉवल पावती दाखवण्यात आली. ती पावती तीच असून ती सुखदेव पवार यांच्या नावे असून ती माझ्या समक्ष जप्त केली होती. ती पावती रंगारी साहेबांनी काढून वाघ साहेबांना दिली होती.

सरतपास संपला.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.एल.ठाणगे यांच्यामार्फतः</u>**

मी सेन्ट्रल बँकेत दरदिवस भत्त्यावर कामावर आहे. माझी नियुक्ती शाखाधिकारी यांनी केली. ज्यावेळेस पंचनामा केला त्यावेळी मी शिक्षण घेत होतो. मला वाघ साहेबांनी बँकेत पंचनाम्यासाठी येण्याबाबत नोटीस दिली नव्हती. वाघ साहेब आणि माझी जवळपास सहा महिन्यांपासून ओळख होती.

हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळेस बँकेत गेलो त्यावेळी त्या सर्व पावत्या रंगारी साहेबांच्या ताब्यात होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळी बँकेत गेलो त्यावेळी वाघ साहेबांनी माझी शाखाधिकारी यांच्याशी ओळख करून दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्या नंतर सेन्ट्रल बँकेत दरदिवस भत्त्यावर रुजु झालो. मी सांगतो की, वर्षभरागोदर रुजु झालो. हे म्हणणे खरे नाही की, वाघ साहेबांच्या व शाखाधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून मी साक्ष देणार असल्याने मला बँकेत नोकरी मिळाली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २५/१०/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.